RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष १२, अंक ११] बुधवार, फेब्रुवारी ४, २०२६/माघ १५, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक २४**

**प्राधिकृत प्रकाशन**

### मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे

(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)

**अधिसूचना**

क्र. मुंमप्र.झोपुप्रा/क्र. ६४/२०२६

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग यांनी बृहन्मुंबईतील रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील अंतिम परिशिष्ट-२ निर्गमित झाल्यानंतर त्यामधील झोपडीचे हस्तांतरण/खरेदी-विक्री करणाऱ्या झोपडीधारकांकरिता एकमेव अभय योजना राबविण्याबाबत शासन निर्णय क्र.विसआ-२०२३/प्र.क्र.१५९/झोपनि-२, दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२४ रोजी निर्गमित केलेला आहे. त्याचप्रमाणे सदरची एकवेळची अभय योजना ठाणे महानगरपालिका क्षेत्राला लागू करण्यासाठी शासन निर्णय विसआ-२०२३/प्र.क्र.१५९/झोपनि-२, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ हा निर्गमित करण्यात आलेला आहे.

त्याअर्थी, शासन निर्णय क्र. क्र.विसआ-२०२३/प्र.क्र.१५९/झोपनि-२, दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२४ नुसार एकवेळची अभय योजनेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांनी प्रलंबित/रखडलेल्या योजनांची यादी अधिसूचित करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तसेच शासनाचे गृहनिर्माण विभागाने दिनांक १४ डिसेंबर २०२५ च्या शासन निर्णयाद्वारे सदरच्या अभय योजनेस दिनांक ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्यापूर्वी शासनाचे गृहनिर्माण विभागाकडे में. तथागत व समभाव को.ऑप.हौ.सोसायटीचा अभय योजनेमध्ये समाविष्ट करण्यासाठी पाठविलेल्या दिनांक २१ ऑगस्ट २०२५ रोजीच्या प्रस्तावावर शासनाचे गृहनिर्माण विभागाने दिनांक २० जानेवारी २०२६ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांचे स्तरावर आवश्यक कार्यवाही करणेचे निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशानुसार खालील झोपडपट्टी पुनर्वसन योजना अभय योजनेसाठी अधिसूचित करण्यात येत आहेत.

**अनुसूची**

| अ. क्र. (१) | योजना व सहकारी गृहनिर्माण संस्थेचे नाव (२) | स.नं./हि.नं., न.भू.क्र., अं.भू.क्र. (३) |
| --- | --- | --- |
| १ | तथागत आणि समभाव सह. गृह. संस्था, मौजे पांचपाखाडी, ता. जि. ठाणे. | सर्व्हे नं. ४०६/ब, हिस्सा नं. २, सर्व्हे नं. ४०६/ब, हिस्सा नं. ३, सर्व्हे नं. १०६, हिस्सा नं. १५, सर्व्हे नं. ३७३, सर्व्हे नं. ३९०/अ, सर्व्हे नं. ३९०/ब (पै.) मौजे माजिवडे, ठाणे (प.). |

**संदीप माळवी,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
मुंबई महानगर प्रदेश,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.